माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 www.rtimahasangh.weebly.com

वर्ष १० वे. अंक ३ रा नवी मुंबई दिनांक १ ते ३१ मार्च २०२१ पाने ८ किंमत २० रूपये




## माहिती मिळण्याची संपूर्ण प्रक्रिया, कालवधी व संदर्भ

## मानवी कर्तव्याचा जाहीरनामा






## हुकूमशाहीचे टूलकीट !

मासिक **नागरिक अधिकार**

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●

**शेखर कोलते**
●कार्यकारी संपादक●

जिल्हा - प्रतिनिधी

जयवंत टेंबूलकर (मुंबई)
प्रभाकर गंगावणे (रायगड)
अब्राहम आढाव (पुणे)
संतोष कदम (सातारा)
बंडोपंत चौगुले (सांगली)
अर्जन रामा असणे (जळगांव)
सोपान पवार (औरंगाबाद)
बळवंत जाधव (लातूर)
जयसिंग सिल्लोडे (जालना)
विलास प्रताप शिंदे (नांदेड)
गोपाळ तौर (बीड)
रोहिदास सावळे (धुळे)
रविकुमार गोरे (हिंगोली)
नामदेव चापके (परभणी)
उज्ज्वल राजपूत (नाशिक)
राजू शिंदे (नंदूरबार)
संतोष जाधव (यवतमाळ)

पत्ता : **नागरिक अधिकार**
शॉप नं.०१ सेक्टर ०९ खांदा कॉलनी
नवीन पनवेल ४१०२०६
मो.९२२३५१६९२०
e- mail : mediamansubhash@gmail.com

अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

## संपादकीय..........

# हुकुमशाहीचे टूलकीट !

सत्ता आणि शक्ती हे अहंकाराचे आई-बाप असतात.म्हणून ज्यांच्या कडे अमर्याद सत्ता आहे व अलोट शक्ती आहे.अशा अहंकारी सत्ताधीशांना हुकुमशाहीचा रोग जडतो.

जनतेचं मोठा गट व छोटा गट अशा दोन गटात विभाजन करा.मोठ्या गटाला साखरलेप लावलेली अस्मितेची लस पाजा.आणि छोट्या गटाच्या माथ्यावर देशातील सगळ्या समस्याचं खापर फोडा. मोठ्या गटाच्या मनात छोट्या गटाबद्दल ओतप्रोत द्वेष निर्माण करा. देशभक्तीचा नगारा वाजवत राहा. छोट्या गटाला देशद्रोही ठरवा. दोन्ही गटांमध्ये परस्परांत झुंज लावून द्या.जो आवाज उठविल त्याचा गळा दाबा.माध्यमातून रात्रन दिवस हुकुमशहांची आरती चालू ठेवा. हुकुमशहा ला देवत्व बहाल करा.आणि मग मस्त मजेत सत्तेचा उपभोग घेत रहा.

ही अशी हुकूमशहाची कार्यपद्धती असते. हे हुकुमशाहीचे टूलकीट असते.

ज्या समाजात हुकुमशाही आकाराला येत असते तेव्हा देशातील शिक्षण,गरीबी,दारिद्र्य, रोगराई,अज्ञान,बेकारी, बेरोजगारी,पाणी टंचाई व पायाभूत सविधांचा अभाव,शेतीचे प्रश्न हे सगळं गोठून जातात.जो अशा प्रश्नावर आवाज उठवेल त्याला अपराधी ठरवून तुरुंगाच्या पिंजऱ्यात बंद केलं जातं.

हुकुमशहांचे एकच ब्रीदवाक्य असते ते म्हणजे - मी म्हणेल तेच सत्य !

लोकांवर प्रभाव निर्माण करणं हे हुकुमशहांच कौशल्य असतं. प्रभावाच्या नशेत बेधुंद झालेले लोक एकमेकांना मरायला व मारायला तयार होतात.हिंसाचार,रक्तपात यांच्या चिळकांड्या उडतात. मानवतेच्या चिंधड्या-चिंधड्या होतात.एक पिढी बरबाद होते.

जगात आजपर्यंत हुकुमशहांनी कोणालाच काहीही दिलेलं नाही.हुकुमशाहीतून कधीही कसलंही श्रेयस जन्माला येत नसतं. गेल्या शतकांत जगाने हुकुमशाहीची खूप मोठी किंमत मोजलेली असताना अजूनही आम्ही भानावर येत नाही आहोत. हे सखेद आश्चर्य आहे.

आपल्या देशातही सर्व पक्षीय सत्ताधारी लोकशाही मूल्यांचा चूराडा करीत आहेत.आजकाल सोशल मिडियावर लिहिलेली एक विरोधातली पोष्ट सुद्धा सत्ताधाऱ्यांना व त्यांच्या पिळावलीला सहन होत नाही.

विरोध दिलदारपणे स्विकारायचा असतो.टीकाकार म्हणजे सत्ताधाऱ्यांना योग्य रस्त्यावरुन चालायला भाग पाडणारे सहकारी असतात. हेच मूळी आपण विसरुन गेलो आहोत. तुरुंग हे उत्तर नाही. बंदूकीची गोळी हा पर्याय नाही.

आणि काही माणसांना मारुन उरलेल्यांना सुखाने जगता येईल हा भ्रम आहे.

द्वेष अंतिमत: सर्वांसाठी घातकअसतो.कोणतीही कट्टरता ही मानवतेचा संकोच करते. जिथे कट्टरतेला फुस दिली जाते.तो समाज सभ्य व भद्र असूच शकत नाही.

मूल्य भाषा हुकुमशहांना समजत नसते. कारण शहाणपण व हुकुमीवृत्ती यांचा दूरदूरचा संबंध नसतो.

पण जनता महान आहे.जनतेला हे शहाणपण एकदिवस नक्की कळतं. तेव्हा डोक्यावरचा हुकुमशहा केव्हा जनतेच्या पायदळी गेला हे त्या हुकुमशहाला कळालेलं सुद्धा नसतं.

# माहिती मिळण्याची संपूर्ण प्रक्रिया,कालवधी व संदर्भ

१.सहाय्यक माहिती अधिकारी / जनमाहिती अधिकारी यांचे कडे माहिती मिळण्यासाठी विनंती अर्ज दाखल करणे.
संदर्भ : केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम कलम -६ (१)

२.जनमाहिती अधिकारी यांनी अर्ज मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत अर्जदारास माहितीच्या पानांची संख्या व माहितीचे एकूण शुल्क पत्राद्वारे कळविणे.
संदर्भ : महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७ / प्र.क्र.(२०८/१७)सहा
सांकेतांक क्रमांक :२०१७१११७११३२२९३००७

३. जनमाहिती यांनी अर्जदारांच्या विनंतीनुसार ३० दिवसांच्या आत फीस भरण्याच्या विनंतीसह माहिती देण्याचीसर्व प्रक्रिया पार पाडून अर्जदारास माहिती पुरवावी. तसेच अपिल अधिकारी अपिलांची मुदत अपिल प्रक्रिया या संबंधीचा तपशील अर्जदारास पुरवावा.
संदर्भ : केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम कलम -७ (१), कलम ७ (३)ख




४. जर तीस दिवसांत जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात रजिस्टर पत्राने पत्रव्यवहार केला नाही.माहिती दिली नाही. किंवा दिलेल्या माहितीने अर्जदारांचे समाधान झाले नाही तर अर्जदार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती मिळाल्यापासून किंवा माहिती देण्याची तीस दिवसांची मुदत संपल्यानंतर पुढील तीस दिवसांच्या आत अपिलीय अधिकारी यांचेकडे अर्जदार अपिल दाखल करू शकतो. संदर्भ : केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (१)

५. नमून्यातील अपिल अर्ज व सोबत मूळ माहिती अधिकार अर्ज जोडपत्र अ ची रिसीव्हड कॉपी ची झेरॉक्स जोडून अपिल सादर करावे. केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम कलम १९

६. अर्ज मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत अपिलीय

**महत्वाची सूचना**

जनमाहिती अधिकारी यांनामाहिती अधिकार अर्ज देताना अर्जासोबत पहिल्या दहा दिवसांत माहितीची पाने व शुल्क कळविणे आवश्यक असल्याचे शासन परिपत्रक सांकेतांक क्र.:२०१७१११७११३२२९३००७ डाऊन लोड करुन जोडा

पहिले अपिल करताना अर्जासोबत : महाराष्ट्र शासन परिपत्रक केंमाअ २००७ /११८२ प्र.क्र.(६५/७/(मा.अ.)
सामान्य प्रशासन विभाग
संगणक सांकेतांक क्रमांक : २००७१२१२१६४१५८००१ डाऊन लोड करून जोडा.व परिपत्रकाप्रमाणे सुनावणीपूर्व प्रक्रिया पूर्ण करावी अशी विनंती करा.
माहिती वेळत मिळावी म्हणून हे गरजेचे आहे.ही परिपत्रके आपल्या महासंघाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

# माहिती मिळण्याची संपूर्ण प्रक्रिया,कालवधी व संदर्भ

अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपिल सुनावणी प्रक्रियाद्वारे चालवून अर्जदार यांना माहिती मिळवून देणे.

७. अर्जदारास सुनावणीच्या पूर्वी किमान सात दिवस अगोदर कळेल अशी दक्षता घेऊन योग्य त्या अवधीमध्ये रजिस्टर पोष्टाने सुनावणीचा दिनांक स्थळ व वेळ कळविणे.केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम कलम १९

८. अर्जदाराला सुनावणी साठी स्वत: हजर राहणे किंवा हजर न राहणे यांतील योग्य व सोईचा पर्याय निवडता येऊ शकतो. किंवा अर्जदार हा आपले लेखी म्हणणे पाठवू शकतो. किंवा अर्जदार हा लेखी पत्र देऊन त्यांचा प्रतिनिधी पाठवू शकतो. असा तपशील रजिस्टर पोष्टाने सात दिवस अगोदर अर्जदार यांना अपिल अधिकारी यांनी कळविला पाहिजे.

संदर्भ : महाराष्ट्र शासन परिपत्रक केंमाअ २००७ /११८२ प्र.क्र.(६५/७/(मा.अ.) सामान्य प्रशासन विभाग

संगणक सांकेतांक क्रमांक : २००७१२१२१६४१५८००१

९.अर्जदार यांनी सुनावणीसाठी दिनांक स्थळ व वेळ लक्षात घेऊन वेळेवर सुनावणीसाठी स्वत: किंवा प्रतिनिधी पाठवून उपस्थिती नोंदवावी. तसे शक्य नसल्यास आपले लेखी म्हणणे अपिल अधिकारी याचेकडे जमा करावे. संदर्भ परिपत्रक संगणक सांकेतांक क्रमांक : २००७१२१२१६४१५८००१

१०.जर अपिल अधिकारी यांनी अपिल मान्य करून माहिती देण्याचे आदेश दिले पण माहिती मिळाली नाही किंवा अपिल ना मंजूर करण्यात आले तर माहिती नाकारल्याच्या दिनांकापासून किंवा अपिल ना मंजूर झाल्याच्या दिनांकापासून पुढील ९० दिवसांच्या आत अर्जदार हा दुसरे अपिल करू शकतो.

संदर्भ : केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३)

११. दुसऱ्या अपिलात विहित मुदतीत माहिती आयुक्त यांच्या कार्यालयात नमून्यात जोड पत्र क अन्वये अर्ज दाखल करावा. अर्जात माहिती न मिळाल्याची सर्व वस्तूस्थिती लेखी मांडावी.जोडपत्र अ व जोडपत्र ब च्या प्रती व मिळाली असल्यास अपुऱ्या व असमाधानकारक माहिती तपशील जोडावा. माहिती मिळण्याची विंनती व जनमाहिती अधिकारी कसुरदार ठरल्यास कायद्यात विहित केल्याप्रमाणे पंचवीस हजार रूपयांचा दंड व विहिती शास्ती लावून कायद्याचे अनुपालन व्हावे अशी विनंती करावी.अर्ज दाखल होताच संबंधीत माहिती आयुक्त यांच्या कार्यालयातून शक्य तितक्या लवकर आपला अर्जाचा संगणक नोंदणी क्रमाक किंवा केस नंबर विचारून ठेवावा. जेव्हा आपण पुढील चौकशी करू तेव्हा सदर केस नंबर उपयूक्त ठरतो.

१२. दुसरे अपिलात अपिल मंजूर झाल्यास निकालपत्रातील आदेशाप्रमाणे आपणास माहिती देणे हे जनमाहिती अधिकारी यांना बंधनकारक आहे. जर जनमाहिती अधिकारी यांनी सदर आदेशाचे पालन केले नाही तर दिलेली मुदत संपताच माहिती आयुक्त यांच्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम कलम -१८ अन्वये तक्रार दाखल करावी.माहिती आयुक्तांचे आदेशाचे जन माहिती अधिकारी यांनी पालन केले नाही व आदेशाप्रमाणे माहिती देण्यास नकार दिला आहे.टाळाटाळ केली आहे किंवा कसूर केला आहे.येणे प्रमाणे योग्य ते कारण नमूद करून शास्ती,दंड लावण्याचे विंनती करावी. जनमाहिती अधिकारी याचे बेजबाबदार वर्तनामुळे अर्जदास आर्थिक भूरदंड व मानसिव त्रास सहन करावा लागला यास्तव योग्य ती नुकसार भरवाई मिळण्याचे आदेश व्हावेत अशी विंनती करावी.

# मानवी कर्त्यव्याचा जाहीरनामा

## THE DECLARATION OF DUTY




बहूसंख्य लोक जगात हक्क (Rights)व अधिकार (entitlements) यांची चर्चा करीत राहतात.
हक्क आणि अधिकार नाकारला गेल्याने जागोजागी माणसांचा दबलेला आवाज, असह्य अक्रोश, विलापीत छळकथा आणि अस्पष्ट हुंदके ऐकायला मिळतात.
म्हणून तर आवाज बुलंद करण्याऱ्या हक्क व अधिकारांचं आपापल्या जागी अनन्य महत्त्व आहेच. ते नाकारण्याचे काहीच कारण नाही.
७० वर्षं झाली संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्कांचा जाहीरनामा काढला.
खरं तर त्याच वेळी मानवी हक्काच्या जाहिरनाम्याला जोड म्हणूम कोणीतरी कर्तव्याचा जाहीरनामा सुद्धा काढायला पाहिजे होता.
पण दुर्दैव असं आहे की,कर्तव्याला धरून कोणी ब्र सुद्धा उच्चारायला तयार नाही.
हक्क व अधिकारांसाठी जगभर मोर्चे, आंदोलन, चर्चासत्र, कार्यशाळा आणि परिषदा यांचा गजबजाट चालू असतो.
तरीही सामान्य व गरीब माणसांला त्याचे हक्क व अधिकार सहजासहजी मिळत नाहीत.
का होतं असं ? चूक कोठे होतेय ?
चूक छोटी आहे. पण परिणाम मोठे आहेत.
फक्त आपला प्राधान्यक्रम चूकतोय.
पहिलं पाऊलचूकलं की बाकीचा सगळा प्रवास चूकीचाच होतो.
म्हणून अगोदर काय ? हक्क की कर्तव्य ?
खर हे आहे कि कर्त्यव्य विसरून हक्क मागता येत नाहीत.
म्हणून पहिल्यांदा कर्त्यव्य नंतर हक्क, ही खरी दिशा आहे. हे योग्य पाऊलआहे.
हक्क मिळविण्याचा आधारच मूळी कर्त्यव्याच्या परिपूर्तीमध्ये सामावलेला असतो.
हक्क नावाचं बाळ कर्त्यव्यं नावांच्या आईच्या मांडीवर शोभून दिसतं.
कर्त्यव्याची परिपूर्ती नसेलतर अधिकार व हक्क अनाथ मुलांसारखे फुटपाथवर रडत फिरतात.
ज्या समाजात व्यक्तीला त्याचे हक्क व अधिकार मिळत नाहीत, खूशालसमजा की तो समाज कर्त्यव्य पालानात

**जो मूल्य मानतो,**
**जो मूल्य पाळतो,**
**जो मूल्य जगतो.**
**असा माणूस**
**कर्त्यव्यशीलअसतो.**

# मानवी कर्त्यव्याचा जाहीरनामा

कसूरदार असणारचं.
कारण जो व्यक्ती कर्तव्य पाळत नाही. शक्यता आहे की त्याला त्याचे हक्क व अधिकार ही मिळत नाहीत.
कर्त्यव्य म्हणजे मी स्विकारलेलं काम किंवा मला मिळालेली भूमिका मी सत्यनिष्ठेने, समयबद्धरितीने, मूल्यप्रामाण्य मानून करीत राहणे.
कर्त्यव्य म्हणजे नेमस्त रेषेवरून पुढे पुढे जात राहणं. कक्षेच्या आत किंवा बाहेर यायचंही व जायचंही नाही.
जो मूल्य मानतो,
जो मूल्य पाळतो,
जो मूल्य जगतो.
असा माणूस कर्त्यव्यशीलअसतो.
जगात कर्त्यव्य करण्याची व जबाबदारी पार पाडण्याची संधी व क्षमता केवळ मानवी प्राण्यामध्येच आहे.
समाजात कर्त्यव्यनिष्ठ माणसांची संख्या कमी झाली की मग शोषण, अन्याय, हिंसा, असुरक्षितता, असहिष्णूता असे सगळे सामाजिक रोग समाजाला वेढा घालतात.
स्व ला अधिकचे महत्त्व न देता इतरांच्या भल्यांसाठी व इतरांच्या कल्याणांसाठी व्यापक हिताने भारून जाऊन आपल्या कामात निरंतर डुंबलेला माणूस म्हणजे कर्त्यव्यनिष्ठ माणूस होय.
हक्क व अधिकारांचा जाहीरनामा तुम्हाला कायद्याच्या पुस्तकांत दिसेल.
पण कर्त्यव्याचा जाहीरनामा कायद्याच्या चोपडीत शोधू नका. तो तेथे मिळणार नाही.
जिथं माणूस माणसांवर माणसासारखं निरंतर प्रेम करतो आहे.
जिथं माणूस समस्त प्राणीमात्रांवर भूतदया उधळतो आहे.
जिथं माणूस त्याची भूमिका समर्पित भावनेनं पुर्ण करतो आहे.
जरा नीट पहा त्या ठिकाणी, त्या क्षणात व त्या कणाकणांत तुम्हाला कर्त्यव्याचा जाहीरनामा झळकताना दिसेल.

## माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम २ (एफ) अन्वये

## माहिती मध्ये याचां समावेश होतो.




**कोणत्याही स्वरुपाची रेकॉर्ड्स,
कागदपत्रे,
मेमो,
ई-मेल,
मते,
सल्ले,
प्रेस प्रकाशने,
परिपत्रके,
ऑर्डर,
लॉग बुक
करार,
अहवाल,
कागदपत्रे,
नमुने,
मॉडेल्स,
कोणत्याही
इलेक्ट्रॉनिक
स्वरुपात
ठेवलेली डेटा सामग्री**

# गावातील वाचनालयची माहिती मिळावण्यासाठी नमूना वापरा माहिती मिळवा

महाराष्ट्रात काही अपवाद वगळता बहुतेक सर्व गावात क किंवा ड दर्जाची शासनमान्य ग्रंथालये चालवली जातात. या ग्रंथालयांना पुस्तेक खरेदी, ग्रंथालय उभारणी व ग्रंथपालाचे मानधन या तरतूदीसाठी शसकीय अनुदान मिळते. पण असे निदर्शनास आले आहे की बहूतेक गावात राजकीय कार्यकर्त्यानी वाचनालये केवळ कागदावरच चालवली आहेत. माहिती अधिकार कार्यकर्त्यानी अर्ज करून आपल्या किंवा परिसरातील गावांतील वाचनालयांची माहिती खालील नमून्यात मागवून ही वाचनालये पारदर्शक पद्धतीने व लोकाभिमूख होउऊन चालवली जातील यांची काळजी घेतली पाहिजे.

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जन माहिती आधिकारी
जिल्हा ग्रंथालय अधिकारी
पत्ता : ------------------------
जिल्हा ----------------------

येथे दहा ररुपयांचा
कोर्ट फी स्टॅम्प चिकटवा

१) अर्जदाराचे नांव : ---------------------------------
२) पत्ता : ------------------------------------------------मोबाईल नंबर ---------------------------
३) माहितीचा विषय - महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम १९६७ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामुग्रीसाठी मान्यता) नियम १९७० व त्यातील वेळोवेळीच्या सुधारणा यां द्वारे संचलित ------ ----------------- या गावातील ----------------------------- --------- या नावाने चालविल्या जाणाऱ्या शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाने आपल्या कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक असलेली माहिती मिळणेबाबत.
४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (ग्रंथालय सुरू झालपासून आज पर्यंत)
१) उपरोक्त सार्वजनिक ग्रथांलय मान्यतेसाठी आपल्याकडे सादर केलेला संपर्ण प्रस्ताव व जोडलेल्या सर्व सलग्न कागदपत्रांच्या छायाप्रती मिळाव्यात.
२) सदर वाचनालयाने गेल्या तीन वर्षातील अनुदान मागणीच्या वेळी ग्रंथालयाने आपल्या कडे जमा केलेले वार्षिक अहवाल व जमा खर्चाचे लेखापरिक्षीत विवरणपत्र व ताळेबंद पत्रकांच्या छायाप्रती मिळाव्यात.
३) आपल्या कार्यालयाकडून गेल्या तीन वर्षात वरील ग्रंथालय व वाचनाालयास मिळालेल्या शासकीय अनुदानाची नोंद असणाऱ्या रजिस्टरच्या छायाप्रती मिळाव्यात.
४ ) सदर ग्रंथालय कायदयातील मापदंडानुसार वाचकांना सेवा देत नसल्याबाबत आपणाकडे आलेल्या तक्रारी छायाप्रती व तक्रारीबाबत आपल्या स्तरावरून झालेली कारवाई याच्या आपल्याकडे असलेल्या नोंदीच्या छायाप्रती देण्यात याव्यात.
५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन. ६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही
(१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे) अर्जदाराची सही
ठिकाण : -------------
दिनांक : / /---- (अर्जदाराचे नाव : ----------------------)

## रेडीमेड अर्ज नमूने आजच खरेदी करण्यासाठी खालील लिंक गुगल सर्च करा.

## www.instamojo.com/subhashbaswekar


















# www.rtimahasangh.weebly.com

# www.facebook.com/rtimahasangh/

## Whats App - 9223516920

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, फ्लॅट-३०५ वसूधा सोसायटी प्लॉट नं.५३ सेक्टर-४-बी आसूडगांव खांदा कॉलनी ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे प्रकाशीत केले. RNI रजि नं. MAHMAR/2011/40781